**आदर्शगांव योजनेंतर्गत महाराष्ट्र आदर्शगाव भूषण पुरस्कार देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः आगायो २०१७ /प्र.क्र.१६/जल-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ०१ नोव्हेंबर, २०१७.

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांकः मृदस१९१/१०९२-/सीआर-२८/६-अे, दिनांक २० फेब्रुवारी, १९९२
२) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक-आगायो-२०१०/प्र.क्र.१६२/जल-८, दिनांक १० मार्च, २०१५
३) शासन शुध्दीपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक-आगायो-२०१०/ प्र.क्र.१६२/ जल-८, दिनांक २४ मार्च, २०१५
४) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक-मफुअ-२०१३/प्र.क्र.३७/जल-८, दिनांक २८ सप्टेंबर, २०१६
५) संचालक (मृदसंधारण) तथा सदस्य सचिव, आदर्शगाव संकल्प व प्रकल्प, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. आगायो/पुरस्कार/९१/२०१७, दिनांक २५ जानेवारी, २०१७

<u>प्रस्तावना :-</u>

आदर्श गांव संकल्प व प्रकल्प योजना वर नमूद दिनांक २० फेब्रुवारी, १९९२ च्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली आहे. सदर योजना लोकसहभागातून ग्राम विकास या संकल्पनेवर आधारीत आहे. गावाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शासनाच्या विविध योजना या गावामध्ये राबविण्यात येतात. यामध्ये प्रामुख्याने शासनाच्या १२ निरनिराळया विभागांच्या एकूण ५९ योजनांचा समावेश आहे. त्यापैकी पाणलोट क्षेत्र विकासाचे काम हे गाभा क्षेत्र म्हणून आणि इतर विभागाचे काम हे बिगर गाभा क्षेत्र म्हणून वर्गीकरण करण्यात आलेले आहे. तसेच या योजनेच्या अंमलबजावणीसाठी आणि संनियंत्रणासाठी राज्यस्तरीय कार्यकारी समिती गठीत करण्यात आलेली आहे. या योजनेच्या दिनांक १३ ऑगस्ट, २०१० च्या मार्गदर्शक सूचना दिनांक १० मार्च, २०१५ च्या शासन निर्णयान्वये व दिनांक २४ मार्च, २०१५ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये सुधारित करण्यात आल्या आहेत.

२ आदर्शगाव योजनेंतर्गत सन २००९-१० पासून सहभाग घेत असलेल्या गावातील उत्कृष्ट काम करणारे गाव, उत्कृष्ट प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण संस्था, उत्कृष्ट ग्रामकार्यकर्त्या, गुणवत्तादायी कामे करणारे ग्रामस्तरीय कर्मचारी यांना शासन स्तरावरुन उचित पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्याच्या दृष्टीने सदर योजनेंतर्गत **महाराष्ट्र आदर्शगाव भूषण पुरस्कार** प्रदान करण्यासाठी शासन स्तरावरुन मान्यता मिळणेबाबत संदर्भ क्र. ५ येथील पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे.

३. सध्या जलसंधारण विभागामार्फत महात्मा फुले जलमित्र पुरस्कार योजना उत्कृष्ट काम करणाऱ्या गाव, तालुका, जिल्हा, अधिकारी/ कर्मचारी, पत्रकार, अशासकीय संस्था, जिल्हाधिकारी यांना पुरस्कार देण्यासाठी ( एकूण पुरस्कार ४६०) संदर्भाधीन क्र.३ येथील दि.२८/९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये घोषित केली आहे. सदर योजनेतच **महाराष्ट्र आदर्शगाव भूषण पुरस्कारां**चा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

आदर्शगाव योजनेंतर्गत सन २००९-१० पासून सहभाग घेत असलेल्या गावातील **उत्कृष्ट काम करणारे गाव, उत्कृष्ट प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण संस्था, उत्कृष्ट ग्रामकार्यकर्त्या, गुणवत्तादायी कामे करणारे ग्रामस्तरीय कर्मचारी** यांना शासन स्तरावरुन उचित पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्याच्या दृष्टीने आदर्शगाव योजनेंतर्गत **महाराष्ट्र आदर्शगाव भूषण पुरस्कार** प्रदान करण्यासाठी या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे. पुरस्कारांसंबंधी शासनाचे निर्णय अंतिम राहतील. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे पुरस्कार निवड समिती गठीत करण्यात येत आहे. :-

| | | |
|---|---|---|
| **१) मा.मंत्री (मृद व जलसंधारण)** | -- | **अध्यक्ष** |
| **२) अध्यक्ष, राज्यस्तरीय कार्यकारी समिती** | -- | **सदस्य** |
| **३) सचिव (मृद व जलसंधारण)** | -- | **सदस्य** |
| **४) सह सचिव (मृद व जलसंधारण)** | -- | **सदस्य** |
| **५) मुख्य अभियंता, लघुसिंचन, जलसंधारण** | -- | **सदस्य** |
| **६) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन** | -- | **सदस्य सचिव** |

**२. आदर्शगाव योजनेंतर्गत द्यावयाचे रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप असून पुरस्काराच्या रकमेचा तपशील खालीलप्रमाणे राहिल :-**

| | **पुरस्कारार्थी** | **पुरस्काराची रक्कम** | | |
|---|---|---|---|---|
| | | **प्रथम क्रमांक** | **द्वितीय क्रमांक** | **तृतीय क्रमांक** |
| **अ** | **उत्कृष्ट आदर्शगाव** | रु. ५.०० लक्ष | रु. ३.०० लक्ष | रु. २.०० लक्ष |
| **ब** | **उत्कृष्ट प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण संस्था** | रु. १.०० लक्ष | रु. ५० हजार | रु. २० हजार |
| **क** | **उत्कृष्ट ग्राम कार्यकर्ता** | रु. २५ हजार | रु. १५ हजार | रु. १० हजार |
| **ड** | **ग्रामस्तरीय शासकीय कर्मचारी** | स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र | स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र | स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र |

**३. पात्रतेचे निकष** :- ज्यांना या योजनेंतर्गत दयावयाच्या पुरस्काराकरिता अर्ज करावयाचा आहे त्यांनी अर्जाचे नमुने राज्यस्तरीय कार्यकारी समितीच्या कार्यालयातून घ्यावेत. याबाबतची सर्व माहितीवजा

मार्गदर्शक सूचना या आदेशाच्या दिनांकापासून कृषि विभागाच्या संकेत स्थळावर ३० दिवसात उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कार्यकारी समितीची राहील.

**४. कार्यपध्दती :-**

१) आदर्शगाव पुरस्कारासाठी पात्रतेच्या अटींची पूर्तता करीत असलेल्या गावाने (ग्रामपंचायतीने)/ प्रकल्प कार्यान्वयन अधिकरण (संस्थेने)/ग्राम कार्यकर्त्याने/गावातील शासकीय कर्मचा-याने कार्यकारी समितीने विहित केलेल्या नमुन्यातील प्रपत्रात माहिती भरुन एकत्रित अर्जाचा प्रस्ताव गावाच्या ग्रामसभेत सादर करावा.

२) गावाच्या ग्रामसभेची मान्यता मिळाल्यास सदर प्रस्ताव ग्रामपंचायतीमार्फत जिल्हास्तरीय समितीकडे मान्यता व शिफारशीसाठी पाठवावा.

३) सादर केलेला प्रस्ताव आणि त्यासोबतचे सहपत्र यावर संबंधितांची तारखेसह सही नसेल अथवा प्रस्ताव अपूर्ण असेल तर त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव फेरसादर करण्याचे निर्देश जिल्हास्तरावरुन दयावेत.

४) त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीस विहित कालावधीत प्राप्त झाल्यास जिल्हास्तरीय समितीने प्रस्तावातील दिलेल्या माहितीची तालुकास्तरीय समितीकडून शहानिशा करावी.

५) सदर शहानिशा करताना प्रस्तावात नमूद केलेली माहिती चुकीची, दिशाभूल करणारी किंवा खोटी दिलेली आहे असे आढळल्यास, प्रस्तावात दिलेली माहिती चुकीची/दिशाभूल करणारी/खोटी असल्याचे लेखी प्रमाणपत्र तालुकास्तरीय अधिकाऱ्याने दयावे, असा चुकीचा प्रस्ताव फेटाळण्यात यावा. तो फेटाळल्यानंतर उक्त प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे अपील दाखल करुन घेतले जाणार नाही.

६) जिल्हास्तरीय समितीने विहित नमुन्यात योग्य ते गुणांकन करुन योग्य त्या शिफारशींसह पात्र प्रस्तावच राज्यस्तरीय कार्यकारी समितीकडे पाठवावे.

७) राज्यस्तरीय कार्यकारी समितीने सदर प्रस्ताव पडताळणीसाठी तांत्रिक समितीचे गठन करावे.

८) याप्रमाणे गठीत करण्यात आलेली तांत्रिक समिती आपला प्रस्ताव पडताळणी अहवाल (तांत्रिक समितीच्या टिप्पणी व गोषवा-यासह) राज्यस्तरीय कार्यकारी समितीस १५ दिवसात सादर करेल.

९) तांत्रिक समितीकडून प्रस्ताव पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर, राज्यस्तरीय कार्यकारी समिती प्रस्तावातील गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या गावांना प्रत्यक्ष भेट देवून गावातील विविध बाबींची तपासणी करील. तसेच गावाने प्रस्तावात दिलेल्या महत्त्वाच्या प्रमुख बाबींची शहानिशा करेल.

१०) या प्रत्यक्ष गाव तपासणी भेटीनंतर राज्यस्तरीय कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत शिफारस केलेल्या प्रत्येक गावास गुण प्रदान करण्यात येतील आणि पहिल्या तीन गावांची /प्रकल्प कार्यान्वयन संस्थांची /ग्राम कार्यकर्ता /ग्रामस्तरीय कर्मचारी यांची आदर्शगाव भूषण पुरस्कारासाठी निवड करेल.

११) ही निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यावर राज्यस्तरावर महाराष्ट्र आदर्शगाव भूषण पुरस्कार सोहळयाचे आयोजन करुन पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

**५. राज्यस्तरीय कार्यकारी समितीची जबाबदारी** :-

१) योजनेत कार्यरत असलेले आदर्शगाव, प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण संस्था, ग्राम कार्यकर्ता तसेच योजनेत कार्यरत असलेल्या आदर्शगावातील ग्रामस्तरीय शासकीय कर्मचारी, ज्यांना या योजनेंतर्गत दयावयाच्या पुरस्कारकरिता अर्ज करावयाचा आहे. त्याच्याकरिता पात्रतेचे निकष, करावयाचे अर्जाचे नमुने तयार करावेत.

२) पुरस्कार अर्जासोबत जोडावयाची सहपत्रे व माहिती तसेच तपासणी दरम्यान उपलब्ध करुन ठेवावयाचे अभिलेख व तत्सम साहित्य याबाबत सर्व प्रपत्र व सूचना राज्यस्तरीय कार्यकारी समितीने तयार करावी व ती अर्जदारास उपलब्ध करुन दयावी.

३) या पुरस्कारासंबंधात विविध बाबीविषयीची गुणपत्रिका, विविध प्रमाणपत्राचे नमुने व माहितीवजा मार्गदर्शक सूचना कार्यकारी समितीने तयार करावी व सर्व संबंधितांना पुरविण्याची जबाबदारीसुध्दा कार्यकारी समितीची राहील.

४) सदर माहिती /सूचना कृषि व जलसंधारण विभागाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कार्यकारी समितीची राहिल.

५) सदर योजना राबविण्यापासून पुरस्कार प्रदानापर्यंतची कार्यवाही करण्याची जबाबदारी कार्यकारी समितीची राहिल.

**६.** सदर पुरस्कार राज्यस्तरीय असल्याने या पुरस्काराचे वितरण जलयुक्त शिवार अभियानाच्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रमाबरोबरच करण्यात येईल.

**७. निधी उपलब्धता :-**

सदर पुरस्काराची रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, सन्मानचिन्ह तसेच पुरस्कार प्रदान कार्यक्रमाचे आयोजनासाठी आवश्यक रु. २५.०० लक्ष इतकी तरतूद खालील लेखाशिर्षांतर्गत मंजूर केलेल्या निधीतून खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**"मागणी क्र.एल- ३, २४०२-मृद व जलसंधारण (००)**
**१०२ मृद संधारण- (०४) मृद व जलसंधारण**
**(०४) (०१) महात्मा ज्योतिबा फुले जल मित्र पुरस्कार (२४०२ १०३७) ०५, बक्षिसे**

८. हा शासन निर्णय नियोजन विभाग अनौ.सं.क्र. ३७/१४७१ दिनांक १९/६/२०१७ तसेच वित्त विभाग अनौ. सं.क्र.३५८/२०१७/व्यय-१५ दिनांक ४/१०/२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०११५००११४९२६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Machhindranath R Shelke

Digitally signed by Machhindranath R Shelke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=422bf862d9fee2734c8e15a0366a265ee1ac1ad3cf944f3bc14563fa5e2610b5, cn=Machhindranath R Shelke
Date: 2017.11.02 12:31:35 +05'30'

**( म. रं. शेळके )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा / विधानपरिषद यांचे खाजगी सचिव महाराष्ट्र विधानमंडळ मुंबई
४. सर्व सन्माननिय संसद सदस्य व विधानसभा / विधानपरिषद
५. मा. मंत्री (मृद व जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
६. मा. राज्यमंत्री (मृद व जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
७. मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८. कार्याध्यक्ष, आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती, पुणे.
९. मुख्य सचिव यांचे सचिव,
१०.सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
११.महासंचालक, माहिती व जनसंपर्क (प्रसिध्दीकरीता),
१२.सर्व विभागीय आयुक्त,
१३.आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१४.संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य,पुणे
१५.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१६.सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय,
१७.कृषि उपसंचालक, आदर्श गांव संकल्प व प्रकल्प समिती,कृषि भवन, पुणे-५.
१८. महालेखापाल, महाराष्ट्र १/२(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई / नागपूर.
१९.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

२०.अधिदान व लेखाधिकारी /निवासी लेखापरीक्षा, मुंबई,
२१.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
२२.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२३.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२४.कक्ष अधिकारी/ जल-११, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५.कार्यासन जल-८ (निवड नस्ती), मृद.व ज.सं.विभाग, मंत्रालय,मुंबई.